सहकार दावा क्र.६०/२०१५
जनता सेंट्रल वि कमलेश
निशाणी क्र.१४ लगत

<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा पुढील उलटतपास प्रतिवादीतर्फे श्री. ठाकुर वकिलांमार्फत शपथेवर सुरू.</u>

१. वादमिळकत ही आजरोजी वादी संस्थेकडे आहे, हे दर्शविण्याकरीता कोणताही दस्त मी अभिलेखावर दाखल केला नाही. वादी संस्थेकडे जे भाडेकरू आहेत त्यांना रितसर पावत्या देण्यात आल्या होत्या. त्या पावत्यांची स्थळप्रत वादी संस्थेकडे असते. सदरच्या प्रती मी अभिलेखावर दाखल केल्या नाहीत. त्या न दाखल करण्याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीकडे भाड्याची थकीत रक्कम नसल्याने, मी त्या पावत्या हेतूपरस्पर अभिलेखावर दाखल केल्या नाहीत. प्रतिवादीचे रू. दोन लाख संस्थेकडे सुरक्षाठेव आहे व ती रक्कम म.न.पा. ने वादमिळकतीचा ताबा घेतल्यापासून ते आजपावेतो वादी संस्थेने प्रतिवादीस परत केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने त्याची सुरक्षा रू. दोन लाख वादी संस्थेला परत मागितली होती. हे म्हणणे खरे नाही की, रू. दोन लाख परत न देण्यासाठी व केवळ प्रतिवादीवर दबाव आणण्यासाठी मी प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीसोबत वादी संस्थेचा तथाकथीत करारनामा झाल्याचे व प्रतिवादीकडे भाड्याची थकीत रक्कम असल्याचे, मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीकडून पैसे उकळण्याच्या हेतूने प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला...

फेरतपास काहीही नाही.

समक्ष

VAIBHAV VASANTRAO JOSHI
Digitally signed by VAIBHAV VASANTRAO JOSHI
Date: 2025.10.04 15:18:40 +0530

दिनांक: ०४.१०.२०२५ (व्ही.व्ही. जोशी)

ठिकाण: अकोला न्यायाधीश

सहकार न्यायालय, अकोला.